पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

# राज्यशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल 2021-22

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## राज्यशास्त्र विभाग-अहवाल 2021-22

### 1. राज्यशास्त्र विषयाची विद्यार्थी संख्या:-

| अ.क्र. | वर्ग | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1. | बी.ए.प्रथम वर्ष | 36 |
| 2. | बी.ए.द्वितीय वर्ष | 24 |
| 3. | बी.ए.तृतीय वर्ष | 17 |

### 2. वेळापत्रक:-

**Pandit Deendayal Upadhyay Education Society's**
**SHRI SANT SAVTA MALI GRAMIN MAHAVIDYALAYA, PHULAMBRI**
**DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE - TIME TABLE-2021-22 FIRST TERM**

| Day<br>Time | Class | 10.50 - 11.40 | 11.40 -12.30 | 12:30 01:20 | 01:20 01:40 | 01.40 -02:30 | 02.30 -03:20 | 03.20- 04:10 | 04.10 -05:00 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MON | B.A.I | | | | INTERVAL | P-II, RVL, F2 | P-I, BCL, G10 | | |
| | B.A.II | P-VI RVL, F2 | | | | | | | |
| | B.A.III | | P-IX BCL, F2 | | | | P-X RVL, F2 | | Project RVL, F2 |
| TUE | B.A.I | | | | | P-II RVL, F2 | P-I BCL,G10 | | |
| | B.A.II | P-VI RVL, F2 | | | | | | | |
| | B.A.III | | P-IX BCL, F2 | | | | P-X RVL, F2 | | Project RVL, F2 |
| WED | B.A.I | | | | | P-II RVL, F2 | | | |
| | B.A.II | P-VI RVL, F2 | | | | | | | |
| | B.A.III | | P-X RVL, F2 | | | | P-XI RVL (Main) F2 | | Project RVL, F2 |
| THU | B.A.I | | | | | P-I BCL, F2 | | | |
| | B.A.II | P-VI RVL, F2 | | | | | | | |
| | B.A.III | | P-X RVL, F2 | | | | P-XI RVL (Main) F2 | | Project RVL, F2 |
| FRI | B.A.I | | | | | P-II RVL, F2 | | | |
| | B.A.II | P-V RVL, F2 | | | | | P-V BCL,G6 | | |
| | B.A.III | | P-IX BCL, F2 | | | | P-XI RVL (Main) F2 | | |
| SAT | B.A.I | | | | | P-I BCL, F2 | | | |
| | B.A.II | P-V RVL, F2 | | | | | P-V BCL, G6 | | |
| | B.A.III | | P-IX BCL, F2 | | | | P-XI RVL (Main) F2 | | |

Pandit Deendayal Upadhyay Education Society's
SHRI SANT SAVTA MALI GRAMIN MAHAVIDYALAYA, PHULAMBRI
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE - TIME TABLE-2021-22 **Second Term**

| Day Time | Class | 10.50 - 11.40 | 11.40 -12.30 | 12:30 01:20 | 01:20 01:40 | 01.40 -02:30 | 02.30 -03:20 | 03.20- 04:10 | 04.10 -05:00 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MON | B.A.I | | | | INTERVAL | P-IV RVL, F2 | P-III BCL, G10 | | |
| | B.A.II | P-VIII RVL, F2 | | | | | | | |
| | B.A.III | | P-XII BCL, F2 | | | | P-XIII RVL, F2 | | Project RVL, F2 |
| TUE | B.A.I | | | | | P-IV RVL, F2 | P-III BCL,G10 | | |
| | B.A.II | P-VIII RVL, F2 | | | | | | | |
| | B.A.III | | P-XII BCL, F2 | | | | P-XIII RVL, F2 | | Project RVL, F2 |
| WED | B.A.I | | | | | P-IV RVL, F2 | | | |
| | B.A.II | P-VIII RVL, F2 | | | | | | | |
| | B.A.III | | P-XIII RVL, F2 | | | | P-XIV RVL(Main) F2 | | Project RVL, F2 |
| THU | B.A.I | | | | | P-III BCL, F2 | | | |
| | B.A.II | P-VIII RVL, F2 | | | | | | | |
| | B.A.III | | P-XIII RVL, F2 | | | | P-XIV RVL (Main) F2 | | Project RVL, F2 |
| FRI | B.A.I | | | | | P-IV RVL, F2 | | | |
| | B.A.II | P-VII RVL, F2 | | | | | P-VII BCL,G6 | | |
| | B.A.III | | P-XII BCL, F2 | | | | P-XIV RVL (Main) F2 | | |
| SAT | B.A.I | | | | | P-III BCL, F2 | | | |
| | B.A.II | P-VII RVL, F2 | | | | | P-VII BCL, G6 | | |
| | B.A.III | | P-XII BCL, F2 | | | | P-XIV RVL (Main) F2 | | |

HEAD OF DEPARTMENT                                        PRINCIPAL

## 3. शैक्षणिक वर्ष प्रारंभ:-

शैक्षणिक वर्ष 2021-22 हे 30 ऑगस्ट 2021 ते 31 जुलै 2022 असे असल्यामुळे, त्यानुसार राज्यशास्त्र विभागातील अध्यापनाचे व उपक्रमाचे नियोजन करण्यात आले.

## 4. विद्यार्थ्यांचे प्रवेश वाढविण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी:-

महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे प्रवेश वाढविण्यासंबंधी विचार करण्यासाठी प्राचार्य व प्राध्यापकांची बैठक दि.30/08/2021 रोजी झाली. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी देण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार दि. 27 ऑगस्ट 2021 रोजी शेलगाव(खुर्द ), पीरबावडा व कोलते टाकली येथील कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी दिल्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना आपल्या महाविद्यालयातील शैक्षिणिक सुविधांची माहिती दिली. 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन भेटी घेतल्या. महाविद्यालयातील शैक्षणिक सुविधांची माहिती देऊन प्रवेश घेण्याचे आवाहन केले.

## 6. संशोधन MOU:-

डॉ. रामकिशन लोमटे यांना राज्यशास्त्र विषयाचे पीएच. डी. संशोधक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने जानेवारी २०२२ मध्ये मान्यता दिली. ज्या महाविद्यालयात संबधित विषयाचे संशोधन केंद्र नसेल तेथील मार्गदर्शकानी इतर संशोधन केंद्राशी संलग्नित व्हावे अशी सूचना विद्यापीठाने काढली. आपल्या महाविद्यालयात पीएच. डी. संशोधन केंद्र नसल्यामुळे देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद येथील राज्यशास्त्र संशोधन केंद्रासोबत दिनांक 15 सप्टेंबर 2021 रोजी MOU केले.

## 7. महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्री जयंती:-

महाविद्यालयात दि.02 ऑक्टोबर 2021 रोजी ‘महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्री जयंती’ निमित्त सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी ‘महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्री यांच्या प्रतिमांना आदरांजली अर्पण केली. राज्यशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. उमाकांत वानखेडे, राज्यशास्त्र विभाग, नवगण महाविद्यालय परळी यांचे ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्राध्यापक व कर्मचारी यांनी महाविद्यालयात एकत्र बसून प्रोजेक्टरच्या माध्यमातून व्याख्यानाचा लाभ घेतला.



**‘महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती’ - प्रतिमांना आदरांजली**




**वक्ते- डॉ. उमाकांत वानखेडे यांचे ऑनलाईन व्याख्यान.**

## 8. भित्तीपत्रक (प्रथम सत्र):-

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दि. 29 नोव्हेंबर 2021 रोजी बाल हक्क या विषयावर भित्तीपत्रक तयार करण्यात आले. बी.ए. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी कु. श्रद्धा वाघ हिने हे भित्तीपत्रक बनविले.




## 5. युवक नेतृत्व विकास शिबिर:-

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 27 एप्रिल 2022 रोजी युवक नेतृत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय औरंगाबाद येथील राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. नवनाथ आघाव हे उद्घाटन सत्राला उद्घाटक व बीजभाषक म्हणून लाभले होते. या श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले शिबिराच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्ष होते. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या प्रार्थनेने झाली. कु. भारती शेवाळे आणि कु. आरती केजभट या विध्यार्थीनिंनी महाविद्यालयाची प्रार्थना म्हटली. दुसऱ्या सत्राचे वक्ते अँड. बाळासाहेब जाधव हे सुद्धा व्यासपीठावर उपस्थित होते.

उपस्थित अतिथींच्या हस्ते सावता महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन झाले.

यानंतर प्रमुख वक्त्यांचा परिचय देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी बनविलेल्या 74 वी घटनादुरुस्ती या विषयावरील भीती पत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. रामकिशन लोमटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामधून शिबिराच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. प्रास्ताविक झाल्यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटक तथा बीजभाषक डॉ. नवनाथ आघाव यांनी बीजभाषन केले. 'युवक नेतृत्व विकास: संधी आणि आव्हाने' या विषयावर बोलताना ते म्हणाले नेतृत्व आतून आले पाहिजे. नेतृत्वात आत्मविश्वास असेल तरच हाती घेतलेले काम पूर्ण होण्यास मदत होते. नेतृत्व करणाऱ्या माणसांच्या मनातील उर्मी चेहऱ्यावर दिसली पाहिजे. आपल्या नेतृत्वात आत्मविश्वास असेल तरच हाती घेतलेले काम पूर्ण होण्यास मदत होते. नेतृत्वाला परिस्थिती कशी आहे. याचे कोणतेच बंधन असत नाही. त्याशिवाय आपल्या मनात युवा अवस्था निर्माण झाली पाहिजे. ध्येय आणि उद्दिष्टांतूनच नेतृत्व उदयाला येत असते. त्याला वयाचे बंधन असत नाही. नेतृत्वाने समोर आलेल्या आव्हानांना सामोरे जायला हवे. या अनुषंगाने त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

युवक नेतृत्व विकास शिबिरात 'व्यक्तिमत्व विकास आणि नेतृत्व' या विषयावरील दुसऱ्या सत्राला अँड. बाळासाहेब जाधव (तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालय फुलंब्री) हे प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते. व्यक्तिमत्व विकास आणि नेतृत्व या विषयावर बोलत असतांना त्यांनी आंतरिक आणि बाह्य व्यक्तिमत्व म्हणजे काय हे स्पष्ट केले. एखादा मूर्तिकार दगडाला आकार देवून व अनावश्यक भाग काढून दगडाची मूर्ती बनवितो. तसे आपण आपल्यातील दुर्गुण काढून टाकून आपले व्यक्तिमत्व घडविले पाहिजे. या व्याख्यानात त्यांनी प्राचीन ऋषी मुनी व गौतम बुद्धासारख्या महामानवाचे उदाहरण देऊन विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी केली. व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू समजून सांगितले.

युवक नेतृत्व विकास शिबिराच्या पहिल्या व दुसऱ्या सत्राचा अध्यक्षीय समारोप श्री. संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांनी केला. पहिल्या व दुसऱ्या सत्राचे सूत्रसंचालन कु.श्रद्धा वाघ व कु. प्रिया वाघ या विद्यार्थिनींनी केले. कु. राजेश्वरी गायकवाड या विद्यार्थिनीने वक्त्यांचे व उपस्थितांचे आभार मानले.

त्यानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. संवाद कौशल्य आणि नेतृत्व या विषयावरील सत्र दुपारी सत्र २:०० वाजता सुरु झाले. या सत्राला म्हणून श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. संजीवकुमार पांचाळ प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते. संवाद कौशल्य आणि नेतृत्व या विषयावर मार्गदर्शन करीत असतांना ते म्हणाले संवादातूनच एकमेकांचे दुःख वेदना समजतात. उत्कृष्ट संवाद कौशल्य असलेले नेतृत्व हे यशस्वी ठरते असे प्रतिपादन डॉ. पांचाळ यांनी आपल्या मार्गदर्शनातून केले.

या सत्राचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाच्या हिंदी विभागाचे प्राध्यापक डॉ. सुरेश मुंढे सर यांनी केला. शिक्षण व्यक्तीची जडण-घडण आणि व्यक्ती राष्ट्रासाठी उपयोगी असते. अध्यक्षीय सामारोपाने शिबिराचा समारोप झाला. सत्राचे सूत्रसंचालन कु. ज्योती जाधव या विद्यार्थिनीने केले. समारोप सत्राचे आभार प्रदर्शन प्रा. बाबासाहेब लहाने यांनी केले. यानंतर शिबिराची सांगता झाली.

## शिबिराचे फोटो




## शिबिराचे उद्घाटन करताना डॉ.नवनाथ आघाव




**कु. भारती शेवाळे आणि कु. आरती केजभट या विध्यार्थीनी प्रार्थना गायली.**



बीजभाषण करताना डॉ.नवनाथ आघाव




विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वक्ते - बाळासाहेब जाधव



पहिल्या सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सुभाष टकले



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वक्ते डॉ. संजीवकुमार पांचाळ



अध्यक्षीय समारोप करताना डॉ.सुरेश मुंढे

www.maharashtratimes.com

महाराष्ट्र टाइम्स

# नेतृत्व आव्हानाला सामोरे जाणारे हवे

**डॉ. नवनात आघाव यांचे प्रतिपादन**

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

'नेतृत्व आतून आले पाहिजे. माणसांच्या मनातील उर्मी चेहऱ्यावर दिसली पाहिजे. आपल्या नेतृत्वात आत्मविश्वास असेल, तरच हाती घेतलेले काम पूर्ण होण्यास मदत होते. नेतृत्वाला परिस्थिती कशी आहे. याचे कोणतेच बंधन असत नाही. नेतृत्वाने समोर आलेल्या आव्हानांना सामोरे जायला हवे,' असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. नवनाथ आघाव यांनी केले.

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त बुधवारी 'युवक नेतृत्व विकास शिबिर' आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्‌घाटन डॉ. आघाव यांच्या हस्ते झाले. त्या वेळी 'युवक नेतृत्व विकास संधी आणि आव्हाने' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते.

दुसऱ्या सत्रात ॲड. बाळासाहेब जाधव यांनी 'व्यक्तिमत्व विकास आणि नेतृत्व' या विषयावर बोलताना व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलघडून सांगितले. शिबिराच्या तिसऱ्या सत्रात प्रा. डॉ.संजीवकुमार पांचाळ यांनी 'संवाद कौशल्य व नेतृत्व' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सुरेश मुंढे उपस्थित राहिले. समारोप सत्राचे आभार प्रा. बाबासाहेब लहाने यांनी मानले. शिबिराचे प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. रामकिशन लोमटे यांनी केले. पहिल्या व दुसऱ्या सत्रात उपस्थित पाहुण्यांचे आभार राजश्री गायकवाड यांनी मानले. भारती शेवाळे आणि आरती केजभट या विद्यार्थिनींनी प्रार्थना म्हटली. श्रद्धा वाघ, प्रिया वाघ, ज्योती जाधव या विद्यार्थिनींनी सूत्रसंचलन केले.




संत सावता माळी महाविद्यालयात युवक नेतृत्व विकास शिबिरात बोलताना डॉ. नवनाथ आघाव.

बातमी - दैनिक महाराष्ट्र टाईम्स



# नेतृत्व हे आव्हानाला सामोरे जाणारे असले पाहिजे

## डॉ.नवनाथ आघाव : सावता माळी महाविद्यालयात नेतृत्व विकास शिबिराची सांगता

फुलंब्री,ता.२७ (बातमीदार) : नेतृत्व हे आव्हानाला सामोरे जाणारे असले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.नवनाथ आघाव यांनी केले आहे.येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त "युवक नेतृत्व विकास शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे उदघाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष टकले उपस्थित होते.

"युवक नेतृत्व विकास संधी आणि आव्हाने" या विषयावर डॉ.आघाव म्हणाले की, नेतृत्व हे आतून आले पाहिजे. माणसांच्या मनातील ऊर्मी चेहऱ्यावर दिसली पाहिजे. नेतृत्वात आत्मविश्वास असेल तरच हाती घेतलेले काम पूर्ण होते. नेतृत्वाला परिस्थिती कशी आहे. याचे कोणतेच बंधन असत नाही. नेतृत्वाने समोर आलेल्या आव्हानांना सामोरे जायला हवे. या अनुषंगाने आपले विचार व्यक्त केले. दुसऱ्या सत्रात ॲड. बाळासाहेब जाधव यांनी "व्यक्तिमत्त्व विकास आणि नेतृत्व" या विषयावर व्याख्यान दिले. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. आर. टकले यांनी केला. शिबिराच्या तिसऱ्या सत्रात प्रा.डॉ.संजीवकुमार पांचाळ यांनी "संवाद कौशल्य व नेतृत्व" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्षस्थानी प्रा. डॉ.सुरेश मुंढे उपस्थित राहिले. समारोप सत्राचे आभार प्रा. बाबासाहेब लहाने यांनी मानले. प्रस्तुत शिबिराचे प्रास्ताविक, शिबिराचे समन्वयक, प्रा.डॉ.रामकीशन लोमटे यांनी केले. तर पहिल्या व दुसऱ्या सत्रात आभार राजश्री गायकवाड यांनी मानले. प्रार्थना भारती शेवाळे आणि आरती केजभट या विद्यार्थिनींनी म्हटली. सूत्रसंचालन श्रद्धा वाघ व प्रिया वाघ तसेच ज्योती जाधव या विद्यार्थिनींनी केले.

फुलंब्री : येथे सावता माळी महाविद्यालयात बोलताना डॉ.नवनाथ आघाव. सोबत उपस्थित मान्यवर.

## अघोषित भारनियमनामुळे ग्राहक हैराण

अंधारी, ता.२७ (बातमीदार): यावर्षी तालुक्यातील सर्व भागात वाजवीपेक्षा अधिक पाऊस ... अबाल वृद्धांची गर्मीने काहिली काहिली होत आहे म्हणून किमान उन्हाळ्यात तरी फूल टाइम वीज

**बातमी - दैनिक सकाळ**

## 10. भित्तीपत्रक प्रकाशन (दुसरे सत्र):-

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने बी. ए. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी कु.प्रिया रामदास वाघ हिने '74वी घटना दुरुस्ती' या विषयावर तयार केलेले भित्तीपत्रक दि. 27 एप्रिल 2022 रोजी सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय औरंगाबाद येथील राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. नवनाथ आघाव प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांच्या हस्ते युवक नेतृत्व विकास शिबिर प्रसंगी प्रकाशित करण्यात आले.




फोटो - भित्तीपत्रक प्रकाशन

## 9. अतिथी व्याख्यान:-

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दि.5 मे 2022 रोजी दुपारी 1:40 ते 2:30 या वेळेत बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थांसाठी प्रा. विठ्ठल शिंदे (शाम गदळे कला व विज्ञान महविद्यालय दहिफळ ता.केज जि.बीड) यांचे '७३ वी घटनादुरुस्ती' या विषयावर ऑनलाईन अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले.




## 11. बी.ए. तृतीय वर्ष प्रकल्प सादरीकरण:-

बी.ए.तृतीय वर्षात राज्यशास्त्र मुख्य विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना 100 गुणाचा प्रकल्प तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले. दिनांक 20 मे 2022 रोजी सकाळी 11:30 वाजता प्रकल्प सादरीकरण प्रक्रिया पूर्ण केली. बहिस्थ परीक्षक म्हणून, राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.किरण धनेधर हे उपस्थित होते.

डॉ. रामकिशन लोमटे
विभाग प्रमुख राज्यशास्त्र
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री